विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागासाठी विविध २१ पदे निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,

शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.११/आस्था-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- ६ डिसेंबर, २०१७.

पहावे : (१) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र.शाकानि.२०१७/प्र.क्र.३३/१८(र.व का.), दि.०९ मार्च, २०१७.

(२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.१९७/ आस्था-१, दि.०९ जून, २०१७.

(३) वित्त विभागाचे पत्र क्र.पदनि-२०१७/प्र.क्र.४२/१७/आ.पु.क., दि.१० ऑक्टोबर, २०१७.

प्रस्तावना :-

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यास व सदर नवनिर्मित विभागासाठी सचिव व अन्य अधिकारी/कर्मचारी यांची एकूण ५१ पदे उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने नव्याने निर्माण करण्यास दि.२७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.१ येथे नमूद दि.०९ मार्च, २०१७ रोजीच्या अधिसूचने अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्र.२ येथे नमूद दि.०९ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समितीने दिलेल्या मान्यतेनुसार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण या नवनिर्मित विभागासाठी सचिव-१ व अधिकारी/कर्मचारी-२९, अशी एकूण ३० पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने या नवनिर्मित विभागाकडे २९ पदे हस्तांतरीत केली आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागामार्फत सचिवाचे १ पद भरण्यात आले आहे. उर्वरित २१ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला असता, प्रस्तावास उच्चाधिकार समितीची मान्यता देण्यात देण्यात आली असल्याचे वित्त विभागाने संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

शासन निर्णय:-

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागासाठी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेली २१ पदे निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	उच्चाधिकार समितीने दि.१९.९.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली पदे
१	सह/उप सचिव	१५६००-३९१०० (७६००)	१
२	कक्ष अधिकारी	९३००-३४८०० (४८००)	२
३	सहायक कक्ष अधिकारी	९३००-३४८०० (४३००)	८

४	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० (१९००)	२
५	वाहन चालक	५२००-२०२०० (१९००)	१
६	उच्चश्रेणी लघुलेखक	९३००-३४८०० (४४००)	१ पद कमी करणे
७	निवडश्रेणी लघुलेखक (स्वीय सहायक)	९३००-३४८०० (४६००)	१
८	निम्नश्रेणी लघुलेखक	९३००-३४८०० (४३००)	२
९	शिपाई	४४००-७४४० (१३००)	५
एकूण			२१

२. यासाठी होणारा खर्च सद्य:स्थितीत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मागणी क्रमांक एन-२, २२५१, सचिवालय-सामाजिक सेवा, ०९०, सचिवालय, (०१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, (०१)(०१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, ०१, वेतन (२२५१ ०११३) या लेखाशीर्षाखाली दाखविण्यात येईल. या विभागास स्वतंत्र तरतूद उपलब्ध झाल्यानंतर सदर खर्च या नवनिर्मित विभागाच्या संबंधित संगणक सांकेतांकाखाली दाखविण्यात येईल.

३. हे आदेश उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४४५/२०१७/व्यय-१५, दि.१६.९.२०१७ व अनौपचारिक संदर्भ क्र.६१५/आपुक, दि.१४.११.२०१७ अन्वये वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२०६१६३३४७००२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2017.12.06 16:38:20 +05'30'

(भा. र. गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोध पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५. सर्व विधानमंडळ, विधानभवन, मुंबई.
६. मा. मुख्यसचिव यांचे सह/उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

८. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
९. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा व लेखा अनुज्ञेयता) मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा अधिकारी , मुंबई.
१२. सचिव (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण) यांचे स्वीय सहायक.
१३. सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे स्वीय सहायक.
१४. सह सचिव (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण) यांचे स्वीय सहायक.
१५. सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई.
१६. वित्त विभाग (व्यय-१५/आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई.
१७. सामान्य प्रशासन विभाग (कार्या.१४), मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (आस्था-१)

****